SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE:EPABX-2609000. AffiliationT1 Section-0231-2609089. 2609146
Web : www.unishivaji.ac.in Email: affiliationt1@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
४१६ ००४, महाराष्ट्र
दूरध्वनी - इपीबीएक्स - २६०९०००, संलग्नता टी.१ विभाग : ०२३१- २६०९०८९. २६०९१४६
वेबसाईट : www.unishivaji.ac.in ईमेल : affiliationt1@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC (2021)
With CGPA 3.52

जा.क्र.एसयु/संलग्नता/स्थान/टे.१/एकेके/458 दिनांक 23 MAR 2026

प्रति,
प्राचार्य / संचालक,
सर्व कला, वाणिज्य, विज्ञान, शारीरिक शिक्षण,
शिक्षणशास्त्र, विधि, महाविद्यालये.

**विषय:-** **महाविद्यालयीन शिक्षकांची ५ व्या, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगानुसार स्टेज-४ AGP ९००० व स्टेज-५ AGP १०००० स्थाननिश्चितीसाठी 'एम.फिल. अर्हताधारक शिक्षकांना नेट सूट - विशेष शिबीर' आयोजनाबाबत.**

संदर्भ:- १. मा.उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई यांचे क्र.संकीर्ण-२२०४/प्र.क्र.९१/विशि-१ दि.१८/०७/२०२५
२. या कार्यालयाचे जा.क्र.एसयु/संलग्नता/स्थान/टे.१/एकेके/१६५६ दि.२०/०९/२०२५ चे पत्र.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयासंदर्भात आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठ अनुदान आयोगाने नेमलेल्या समितीच्या शिफारशीनुसार दि.११/०७/२००९ पूर्वी एम.फिल. पदवी पूर्ण केलेल्या आणि दि.१४ जून, २००६ रोजी किंवा त्यापूर्वी नियुक्ती झालेल्या नियमित/कायमस्वरुपी सेवेत असल्याने शिक्षकांना राष्ट्रीय पात्रता चाचणी (NET) परीक्षेमधून सूट देण्यात आलेली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.०२/०७/२०२५, शासनपत्र दि.१८/०७/२०२५ व संचालनालयाच्या दि.२२/०७/२०२५ रोजीच्या पत्रास अनुसरुन, विद्यापीठ कार्यालयामार्फत सदरचे पत्र व यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दि.०२/०८/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर पत्राच्या अनुषंगाने, सदर यादीतील Recommended महाविद्यालयीन शिक्षकांची ५ व्या, ६ व्या व ७ व्या वेतन आयोगानुसार **वरिष्ठ श्रेणी / स्टेज २ (AL ११), निवड श्रेणी /स्टेज ३ (AL १२), स्टेज-४ AGP ९००० व स्टेज-५ AGP १०००० स्थाननिश्चिती** करण्यासाठी संबंधित शिक्षकांचे प्रस्ताव महाविद्यालयाकडून मागवून घेऊन विद्यापीठामार्फत केंद्रिय पध्दतीने विशेष शिबीराचे आयोजन करण्यात येणार असल्याने संदर्भीय क्र.२ च्या पत्रान्वये स्थाननिश्चितीसाठीचे प्रस्ताव मागविण्यात आले होते.

त्यानुसार या कार्यालयामार्फत दि.१७ व १८ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत वरिष्ठ श्रेणी / स्टेज २ (AL ११), निवड श्रेणी /स्टेज ३ (AL १२) स्थाननिश्चिती शिबीर पार पडलेले असून सदर शिबीरातील पात्र शिक्षकांनी तसेच ज्या शिक्षकांची नांवे उपरोक्त यादीमध्ये Recommended असतील, अशा शिक्षकांनी **स्टेज-४ AGP ९००० व स्टेज-५ AGP १०००० स्थाननिश्चिती**साठी आवश्यक ते शुल्क भरुन, सर्व आवश्यक ती कागदपत्रे (नियमित मान्यता, चेंजिस इन स्टाफ मान्यतेसह) जोडून प्रस्तावावर **'एम.फिल. अर्हताधारक शिक्षकांना नेट सूट - विशेष शिबीर'** असा स्पष्ट उल्लेख करुन, दिनांक **२३ ते ३१ मार्च, २०२६** पर्यंत प्रस्ताव प्राचार्यांमार्फत सादर करावेत.

ज्या शिक्षकांचे उपरोक्तनुसारचे स्टेज-४ AGP ९००० व स्टेज-५ AGP १०००० स्थाननिश्चितीचे प्रस्ताव यापूर्वी कार्यालयात सादर केलेले आहेत, अशा शिक्षकांनी पुन:श्च प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता नाही.

सदरचे पत्र आपल्या महाविद्यालयातील सर्व संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणावे.

कळावे,

आपला विश्वासू

(जी. आर. पळसे)
उपकुलसचिव, संलग्नता टी.१ विभाग